!! श्री !!

खासदार चंद्रकांत खैरे
शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३४५/१८/०६/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आय ए एस अॅकॅडमी तर्फे स्पर्धा परिक्षकांना वर्षभर मोफत प्रशिक्षण

### युपीएससी, एमपीएससी स्पर्धा परिक्षकांना सुवर्णसंधी

**संभाजीनगर : ( ता.२८ )** शिवसेना व शिवविद्या प्रबोधिनी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील १००० विद्यार्थ्यांना संपूर्ण वर्षाकरिता विनामुल्य स्पर्धा परिक्षा साहित्य व मार्गदर्शन दरवर्षी देण्यात येते. यांचाच एक भाग म्हणुन संभाजीनगर शहर व जिल्ह्यातील होतकरु व गरजु स्पर्धा परिक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आय. ए. एस. अॅकडमी तर्फे शिवसेना भवन शिवाई ट्रस्ट, संभाजीनगर येथे अभियान राबवण्यात येणार आहे.

अॅकॅडमीचे संचालक शिवसेना उपनेते विजय कदम रविवारी संभाजीनगर केंद्राला भेट दिली असता हि माहिती दिली. यावेळी जिल्हाप्रमुख सुहास दाशरथे, नरेंद्र त्रिवेदी, उपजिल्हाप्रमुख बंडू ओक, शहरप्रमुख राजु वैद्य, बाळासाहेब थोरात, जिल्हायुवाधिकारी नगरसेवक ऋषिकेश खैरे, डॉ. मोहन जोशी, यांची उपस्थिती होती.

प्रशिक्षण वर्गापुर्वी विद्यार्थ्यांना १९ जुन ते २३ जुलै दरम्यान प्रवेश अर्ज भरावा लागणार आहे. १९ जुलै रोजी प्रवेश परिक्षा, २७ जुलै ला परिक्षा निकालानंतर २ ऑगस्ट रोजी प्रशिक्षण वर्गाला सुरुवात होणार आहे. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी डब्लू. डब्लू. डब्लू. डॉट एस व्ही पी आय एस डॉट कॉम या संकेतस्थळावर संपर्क साधवा. तसेच प्रत्यक्ष चौकशीसाठी, शिवाई ट्रस्ट, शिवसेना भवन, संभाजीनगर येथे डॉ. मोहन जोशी यांची संपर्क साधण्याचे आवाहन शिवसेना-युवासेना संभाजीनगरच्या वतीने करण्यात आले.

प्रसिध्दी प्रमुख

गणेश वाघ / मनोज वडगावकर

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३१११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400